।। सा विद्या या विमुक्तये ।।
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED
"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)
Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

P.G. SECTION
Phone: (02462) 229574 website: srtmun.ac.in e-mail: dr.pg.srtmun@gmail.com

जा.क्र. पीजी/आर्थीकदृष्टया दुर्बल/२०१८–२०१९/३७४६ दि.२६/०६/२०१८

प्रति,
मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

विषय: आर्थीकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्याकडून प्रवेशाच्या वेळी पात्र विद्यार्थ्याच्या हिश्श्याची शिक्षण शुल्काची रक्कम शिक्षण संस्थांनी न घेण्याबबात तसेच संबंधित पात्र लाभार्थी विद्यार्थ्यास डी.बी.टी.व्दारे अनुज्ञेय शिष्यवृत्तीची रक्कम ही त्यांनी त्यांच्या महाविद्यालयास शुल्कापोटी तात्काळ अदा करणे बाबत.

संदर्भ: उशिसं/शिष्य–२०१८/ईबीसी/७२१२, दि.२२.०६.२०१८.

महोदय/महोदया,

वरील विषयांच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यांत येते की, आर्थीकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्याकडून प्रवेशाच्या वेळी पात्र विद्यार्थ्याच्या हिश्श्याची शिक्षण शुल्काची रक्कम शिक्षण संस्थांनी न घेण्याबबात तसेच संबंधित पात्र लाभार्थी विद्यार्थ्यास डी.बी.टी.व्दारे अनुज्ञेय शिष्यवृत्तीची रक्कम ही त्यांनी त्यांच्या महाविद्यालयास शुल्कापोटी तात्काळ अदा करण्याबाबतच्या सुचना महाविद्यालयांतील प्राचार्य व त्यांचे मार्फत संबधीत विद्यार्थ्याच्या निदर्शनास आणून देण्यात याव्यात, असे संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

तेव्हा संदर्भीय पत्रामध्ये नमुद करण्यात आलेल्या १ ते ५ संदर्भीय शासन निर्णय/पत्रान्वये योग्य ती कार्यवाही करण्यात यावी, ही विंनती.

आपला विश्वासू,
स्वा/–
उपकुलसचिव
पदव्युत्तर विभाग

सोबत: संदर्भीय पत्र.

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
## महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.

web: www.dhepune.gov.in E-mail: scholarshiphd2@gmail.com

फोन नं.०२०/२६१२६९३९ फॅक्स ०२०/२६१११११५३


क्र.उशिसं/शिष्य-२०१८/ईबीसी/ ७२१२ दि. २२/०६/२०१८

**परिपत्रक**

**विषयः- आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्या वेळी पात्र विद्यार्थ्यांच्या हिश्श्याची शिक्षण शुल्काची रक्कम शिक्षण संस्थांनी न घेण्याबाबत तसेच संबंधित पात्र लाभार्थी विद्यार्थ्यांस डी.बी.टी. द्वारे अनुज्ञेय शिष्यवृत्तीची रक्कम ही त्यांनी त्यांच्या महाविद्यालयास शुल्कापोटी तात्काळ अदा करणेबाबत..**

संदर्भ :- १. शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र. ३३२/तांशि-४, दि. ०७.१०.२०१७
२. शासन परिपत्रक क्र. ईबीसी-२०१८/प्र.क्र.३८/तांशि-४, दि. १४.०२.२०१८
३. संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०१७/ईबीसी/२०२७, दि. १७.०२.२०१८
४. शासन निर्णय क्र. टीईएम-२०१८/प्र.क्र. ३५/तांशि-४, दि. ३१.०३.२०१८
५. संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०१७/ईबीसी/४४३२, दि. ०९.०४.२०१८

उपरोक्त विषयाबाबत दि. ०७/१०/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांसाठी लाभाची व्याप्ती वाढविण्यात आलेली आहे तसेच काही नवीन अभ्यासक्रमांचाही समावेश करण्यात आलेला आहे. सदर शासन निर्णयानुसार आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेचा लाभ देण्यात येतो.

दि. ३१.०३.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून मान्यताप्राप्त व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये शिकणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्तीसाठी पालकांची उत्पन्न मर्यादा रुपये ६.०० लाखावरुन वार्षिक रुपये ८.०० लाख करण्यात आलेली आहे. सदर शासन निर्णयाची प्रत संचालनालयाच्या संकेतस्थळांवर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

**दि. ०७.१०.२०१७ रोजीच्या शासन निर्णयातील मुद्दा क्र. ४२ अन्वये सदर योजनेअंतर्गत विद्यार्थ्यास अनुज्ञेय असणाऱ्या शिक्षण शुल्क शिष्यवृत्तीची रक्कम ही संबंधित विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्या वेळी आगाऊ स्वरुपात घेऊ नये व विद्यार्थ्यांची पिळवणूक होणार नाही याची योग्य ती खात्री शैक्षणिक संस्था करेल.** तसेच संबंधित पात्र लाभार्थी विद्यार्थ्यांस डी.बी.टी. द्वारे अनुज्ञेय शिष्यवृत्तीची रक्कम ही त्यांनी त्यांच्या महाविद्यालयास शुल्कापोटी तात्काळ अदा करावी व याची सर्वस्वी जबाबदारी ही संबंधित विद्यार्थ्यांची असेल. याबाबत स्पष्ट सूचना देण्यात आलेल्या आहेत.

सदरच्या सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी. सदरचे परिपत्रक संचालनालयाच्या www.dhepune.gov.in संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले आहे.

(डॉ. मोहन खताळ)
शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

प्रत :- १. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण विभाग
सदर परिपत्रकाच्या अनुषंगाने देण्यात आलेल्या सूचना आपल्या अधिनस्त असलेल्या विद्यापीठांतील कुलसचिव व महाविद्यालयांतील प्राचार्य यांच्या निदर्शनास आणून देणेत याव्यात.

२. कुलसचिव, अकृषि विद्यापीठे
सदर परिपत्रकाच्या अनुषंगाने देण्यात आलेल्या सूचना आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व महाविद्यालयांतील प्राचार्य व त्यांचे मार्फत संबंधित विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देणेत याव्यात.

३. प्राचार्य, शासकीय, अशासकीय अनुदानित, टप्पा अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालये यांना विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण विभाग तसेच कुलसचिव, अकृषि विद्यापीठे यांचे मार्फत.

Scanned by CamScanner